स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील
पीएच.डी.पदवीसाठी सादर करावयाच्या

शोध प्रबंधाची रुपरेषा

संशोधन विषय

“भारतातील शैक्षणिक धोरणांचा ऐतिहासिक अभ्यास”
(१८०० -२०२०)

संशोधक
मारोती लक्ष्मणराव सोनकांबळे
एम.ए. (इतिहास), एम.फिल.,सेट.

मार्गदर्शक
डॉ.विजय पांडूरंग कुलकर्णी
एम.ए., पीएच.डी.

प्राचार्य व इतिहास विभागप्रमुख
वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय,
देगलूर, ता.देगलूर. जि.नांदेड

संशोधन केंद्र
इतिहास विभाग, ज्ञान उपासक शिक्षण मंडळ, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, परभणी

-२०२३-

“भारतातील शैक्षणिक धोरणांचा ऐतिहासिक अभ्यास”
(१८०० - २०२०)

संशोधन विषय:

१. प्रस्तावना

२. समस्या सुत्रण किंवा समस्या विधान

३. संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये

४. संशोधन विषयाची आवश्यकता

५. संशोधनाची गृहितके

६. संशोधन पध्दती

७. प्रकरणाची वर्गवारी

८. संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा

९. आजवर झालेल्या संशोधनाचा आढावा (संशोधन विषयाचे वेगळेपण)

१०. संशोधन विषयाचे महत्व

११. संदर्भ सुची

“भारतातील शैक्षणिक धोरणांचा ऐतिहासिक अभ्यास” (१८०० – २०२०)

१. प्रस्तावना:

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे महत्वाचे माध्यम असते. प्राचीन काळापासूनच भारतात वैशिष्ट्येपूर्ण शिक्षण व्यवस्था उदयास आल्याची दिसून येते, भारतीय शिक्षण व्यवस्थेची वैभवशाली परंपरा तत्कालीन संपूर्ण जगाला ज्ञात होती. प्राचीन काळामध्ये गुरुकुल, शिक्षण पध्दती अस्तित्वात होती गुरुच्या घरी जाऊन धनुर्विद्या, वेद, अध्ययने सूत्र, आयुर्वेद, धर्म, न्याय, आरोग्य, नीतिमत्ता इत्यादी विषयाचे शिक्षण घेतले जात असत. बौध्दकाळात बौध्दांची शिकवण, आचारसंहिता, शिकविली जात असे. प्राचीन काळात नालंदा, विक्रमशिला, तक्षशिला ही नावाजलेली विद्यापीठे भारतात निर्माण झालेली होती. ज्यामध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी भारतात येत असत.

मध्ययुगीन कालखंडामध्ये शिक्षण व्यवस्था ही काही मोजक्या समूहाशी निगडित होती. राजे, महाराजे, सत्ताधीश यांच्याकडे राजदरबारात असलेल्या विद्वान व्यक्तीकडून, उलेमांकडून धार्मिक, चिकित्सा,अरबी साहित्य, व्याकरण, प्राथमिक शिक्षण, मदरसात आणि दर्गा येथे तर्कशास्त्र, तबीयी, रियाजी, विज्ञान, दर्शनशास्त्र, इतिहास, गणित, ज्योतिष्य, विधी, भुगोल, चिकित्साशास्त्र, राजनीती, युध्दकला,कुटनीती, संगीत इ.विषय शिकवले जात असे.

पेशवेकालीन शिक्षण व्यवस्था ही परंपरागत होती, विषमतेवर आधारित होती. मनुस्मृतीच्या अनुकूल ही व्यवस्था असल्यामुळे समाजातील खूप मोठा समूह हा शिक्षणापासून वंचित होता. त्याचबरोबर पेशवे काळात शिक्षणाविषयी व्यापक दृष्टिकोन नव्हता संकुचित मानसिकतेवर आधारलेली पेशवेकालीन व्यवस्था होती.

दरम्यान, स्पृश्य- अस्पृश्य असा भेदभाव होता म्हणून या काळात शैक्षणिक विषमता होती ब्रिटिशांनी भारतामध्ये इंग्रजी भाषेतील साहित्य, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, वैज्ञानिक ज्ञान, औद्योगिक विकास, संस्कृत भाषा, व्याकरण, ग्रंथ, शब्दकोश, पुस्तके-पत्रिका व राजनीति राजकिय ज्ञान तसेच

सामाजिक सुधारणा याचा भारतीय संस्कृती व वैज्ञानिक दृष्टीने अभ्यास केला जाऊ लागला, तर सार्वजनिक शिक्षणाची मुद्रणालये, रेडिओ, सिनेमा याविषयी भारतीयांना परिचय झाला.

ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणाचा मुख्य हेतू हा होता की, भारतीय व्यक्ती हा जरी शरीराने भारतीय असला तरी, बुध्दीने ब्रिटिश विचारधारेचा झाला पाहिजे. अशीच शिकवण दिली गेली त्यामुळे तो ब्रिटिश विचारधारेचा बनत गेला. भारतीयांना मुळ भाषेपेक्षा इंग्रजी भाषा महत्वाची वाटू लागली. यामुळेच भारतीय लोक ब्रिटिशांची नोकरी करीत आर्थिक गुलाम बनले होते.

भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला आणि ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला. तेव्हापासूनच भारताचे स्वतंत्र शैक्षणिक धोरण राबविले गेले. मौलाना अबुल कलाम आझाद हे भारताचे पहिले शिक्षणमंत्री होते, त्यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र भारताचे भारतीय संस्कृती समाज विचारधारा यास अनुसरुन शैक्षणिक धोरण राबविले.

२. समस्या सूत्रण:

वर्तमान काळात भारतीय शिक्षण पध्दती विषयक राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक पैलूनी विविध प्रश्न उपस्थित होतात. भारतीय शैक्षणिक क्षेत्रातील विषमता वाढत आहे काय ? तसेच शिक्षण क्षेत्रातील खाजगीकरण हे योग्य की अयोग्य ? शैक्षणिक क्षेत्राकडे जाणकार लोकांचे तसेच राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष होत आहे काय ? प्रचलित शिक्षणातून युवा पिढीमध्ये नैराश्य वाढते आहे काय ? शैक्षणिक क्षेत्रातील भरती प्रक्रियेत काही दोष उणिवा आहेत काय ? शिक्षण हे रोजगाराभिमुख आहे काय ? गरीब शिषित तरुणांच्या भवितव्याची उपेक्षा होत आहे काय ? तथाकथित शिक्षण प्रणालीवर शिक्षण सम्राटांचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे काय ?

एकूणच विविध काळातील शैक्षणिक धोरणांची अपेक्षित उद्दिष्टे पूर्ण झाली आहेत काय ? व ती उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी काय उपाययोजना कराव्या लागतील असे अनेक गहन प्रश्न शैक्षणिक धोरण व शैक्षणिक परिस्थितीबाबत निर्माण होतात. या विविध प्रश्नांची उकल करण्यासाठी 'भारतातील शैक्षणिक धोरणांचा ऐतिहासिक अभ्यास' या विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे.

३. संशोधनाची उद्दिष्टे:

* भारतीय शिक्षण पध्दतीचे भारतीय विकास प्रक्रियेतील योगदान अभ्यासणे.
* ब्रिटिश काळातील व स्वातंत्र्योत्तर शिक्षण पध्दतीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
* शैक्षणिक जनजागृतीचा भारतीय समाजावरील प्रभावाचा अभ्यास करणे.
* काळानुरुप बदलत गेलेल्या शैक्षणिक धोरणातील स्थित्यंतरांचा आढावा घेणे.
* सामाजिक व शैक्षणिक प्रबोधनातून आकारास आलेल्या समाज व्यवस्थेचे अध्ययन करणे.
* भारती शैक्षणिक धोरण आणि सामाजिक उन्नती यातील सहसंबंध पडताळणे आणि शिक्षणातून नैतिक मूल्यांच्या वृध्दीला चालना देणे.
* शिक्षण क्षेत्रात बळावलेल्या अपप्रवृत्तीचे निर्मूलन करणे.
* राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या उपयोगीतेचे महत्व पटवून देणे.

४. संशोधन विषयाची आवश्यकता:

शिक्षण हा घटक अत्यंत महत्वाचा आहे कारण, शिक्षणाच्या माध्यमातून संपूर्ण जगात परिवर्तन, सुधारणा, विकास घडून आला आहे. जगातील अनेक देशांनी परंपरागत व्यवस्थेतील उणिवा दूर करुन त्यात सातत्याने सुधारणा करण्याचे उद्दिष्टे समोर ठेवून त्यानुसार वेळोवेळी विचार मंथन करुन नवीन बदल स्वीकारले आहेत. म्हणून दिवसेंदिवस, काळानुरुप शिक्षण पध्दतीत सुधारणा करण्यात आले आहेत, शिक्षणाचा प्रभाव समाजातील, नवीन पिढीवर व संपूर्ण समाजावर असतो. शिक्षणाच्या माध्यमातून नवीन कौशल्य, नैतिकता, मानवता, आचरण, विश्वासर्हता, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, नवीन शोध, सांस्कृतिक वारसा-विचारधारा, आदर्शवादी व्यक्तीमत्वाची प्रेरणा, त्याचा जीवन प्रवास या सर्व बाबतीत समाजाला-देशाला अनुकूल भविष्यात येणाऱ्या आव्हानांना धैर्याने तोंड देणारा परिपक्व समाज घडवण्याची ताकद ही शिक्षण व्यवस्थेत असते. त्या अनुशंगाने शैक्षणिक धोरणांचा संशोधनात्मक अभ्यास करणे आवश्यक वाटते.

आजपर्यंतच्या शैक्षणिक धोरणांचा समर्पक अभ्यास व त्याची उपयुक्तता लक्षात घेणे आवश्यक आहे. तसेच आजपर्यंतच्या शैक्षणिक धोरणांतील उणिवांचा, त्रुटींचा आढावा घेऊन वर्तमान शिक्षण पध्दतीच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी व उपयुक्त परिवर्तनात्मक उपाय योजना सुचविण्यासाठी या प्रबंध विषयाची आवश्यकता आहे.

५. गृहीतके:

* शैक्षणिक धोरणातून सामाजिक उत्थानाला चालना मिळते.
* शिक्षण विषयक नियोजनबध्द धोरण व योग्य अंमलबजावणीचा अभाव हे वाढत्या बेरोजगारीचे कारण आहे.
* १९ व्या शतकातील शैक्षणिक जागृती करणाऱ्या समाजसुधारकांचा व्यापक आदर्शवादी दृष्टिकोन स्वातंत्र्योत्तर काळात लोप पावला.
* शैक्षणिक क्षेत्रातील विनाअनुदान धोरण, कायमस्वरुपी विनाअनुदान धोरण इ.बाबी शैक्षिणिक विकासाला मारक आहेत.
* शैक्षणिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना अशैक्षणिक कामाचा बोजा शैक्षणिक विकासात बाधा आणणारा घटक आहे.
* देशातील भौगोलिक, सामाजिक, नैसर्गिक परिस्थितीला अनुसरुन कौशल्यभिमुक्ता वाढविणाऱ्या शैक्षणिक धोरणांची नितांत गरज आहे.
* शिक्षणातून मानसिक, बौध्दिक परिवर्तन होऊन उत्कृष्ट व्यक्तिमत्वातून विकासाला, सामाजिक प्रगतीला चालना मिळते.
* शिक्षणातून दूरदृष्टी प्राप्त होते, त्यातून स्वत:चा व समाजाचा विकास साधता येतो.
* शिक्षणातून सामाजिक, धार्मिक, राजकीय परिवर्तन आणता येऊ शकते.
* शैक्षणिक धोरणाच्या परिणामकारक अंमलबजावणीतून धर्मद्वेष, जातीपातीच्या आधारावर होणारे दंगे, हत्या, अत्याचार, सामाजिक- धार्मिक दुष्कृत्य संपुष्टात आणता येते.

* शिक्षण हा घटक भारतीय समाजाला एकात्मता, समानता, बंधुता या तीन सूत्राच्या आधारे प्रगतीच्या दिशेने घेऊन जाणारा महत्वपूर्ण घटक आहे.
* शिक्षणातून सामाजिक, धार्मिक, राजकीय विषमता नष्ट करता येऊ शकते.

६. संशोधन पध्दती:

प्रस्तुत शोध प्रबंधासाठी खालील संशोधन पध्दतीचा अभ्यास करण्यात येणार आहे. शैक्षणिक धोरणाबाबतचे शासकीय रेकॉर्ड, तसेच शैक्षणिक क्षेत्रातील विद्वानांच्या व शिक्षक, शिक्षकेत्तर वृंद, संचालक, शिक्षणमंत्री यांच्या प्रातिनिधिक स्वरुपातील मुलाखती घेऊन तथ्य संकलन केले जाईल व तसेच नियतकालिके, वृत्तपत्रे, लेख, छायाचित्रे इत्यादींचा उपयोग आवश्यकतेनुसार केला जाईल. शिक्षण तज्ज्ञांनी लिहिलेल्या संदर्भ ग्रंथाचाही आधार घेतला जाईल आणि सर्व साधनातून संकलित झालेल्या तथ्य संकलनाच्या आधारे शोध प्रबंधाची विश्लेषणात्मक पध्दतीने मांडणी केली जाईल.

७. प्रकरणाची वर्गवारी:

: प्रकरण पहिले :

विषय प्रवेश

या प्रकरणात शोध प्रबंधाची रुपरेषा प्रतिपादन केले जाईल यामध्ये संशोधनाची उद्दिष्टे, संशोधन विषयाची आवश्यकता, गृहीतके, संशोधन पध्दती, प्रकरणांची वर्गवारी आणि या विषयाची व्याप्ती व मर्यादा, तसेच आजवर झालेल्या संशोधनाचा आढावा आणि संशोधन विषयाचे वेगळेपण या विषयाचे महत्व आणि संदर्भसूची इ.घटकाचा समावेश संशोधनाच्या रुपरेषा या घटकांमध्ये करण्यात आलेला आहे.

: प्रकरण दुसरे :

भारतीय शिक्षण प्रणालीचा इतिहास

या प्रकरणात भारतीय शिक्षण प्रणालीचा उदय, उगम कसे झाले याबद्दल प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक शिक्षण प्रणालीत बदल कसे होत गेले याविषयीची सविस्तर मांडणी करण्यात येईल. भारतीय शिक्षण प्रणाली ही गुरुकुल पासून सुरुवात झाली आणि आता विश्वगुरुच्या भूमिकेत जगासमोर उभी आहे, उभी होण्याचा प्रयत्न करीत आहे. याविषयी सखोल अशी मांडणी या प्रकरणात केली जाणार आहे.

: प्रकरण तिसरे :

ब्रिटिशकालीन शैक्षणिक धोरणे व शिक्षण प्रणाली (१८००-१९४७)

सत्ता स्थापनेनंतर ब्रिटिशांनी भारतात शैक्षणिक दृष्टिकोनातून १८०० सालापासून ते १९४७ पर्यंत जी धोरणे आखली त्याविषयीची सखोल मांडणी या प्रकरणात करुन त्याची तत्कालीन उपयुक्ता पडताळणी जाईल.

: प्रकरण चौथे :

स्वातंत्र्योत्तर शैक्षणिक धोरणे व शिक्षण प्रणाली (१९४७-२०२०)

या प्रकरणात ब्रिटीशांपासून भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर स्वतंत्र भारतातील तज्ज्ञ व्यक्तीकडून जी धोरणे राबविण्यात आली त्या सर्व धोरणांचा १९४७ ते २०२० पर्यंतचा सविस्तर आढावा या प्रकरणात घेण्यात येईल. व त्यातील उपयुक्तता पडताळली जाईल.

: प्रकरण पाचवे :

शैक्षणिक धोरणे व आधुनिक भारताची जडणघडण

भारतातील शैक्षणिक धोरणामुळे भारतीय समाजाची बौध्दीक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, औद्योगिक दृष्टीने कशा पध्दतीने भारतीय समाजात परिवर्तन घडून आले. त्यामुळे समाज आधुनिक बनत गेला व भारताची जी जडणघडण झाली. याविषयी सविस्तर मांडणी या प्रकरणात करण्यात येईल.

: प्रकरण सहावे :

उपसंहार (निष्कर्ष व शिफारशी)

या प्रकरणात सर्व प्रकारच्या मांडणीचा सारांश रुपाने आढावा घेतला जाणार आहे. तसेच संशोधनातून प्राप्त झालेल्या निष्कर्षाची मांडणी करुन त्यातून हाती आलेल्या निष्कर्षाची व शिफारशीची मांडणी केली जाईल.

८. संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा:

ब्रिटीश काळातील शैक्षणिक धोरण व स्वातंत्र्योत्तर काळातील शैक्षणिक धोरण इस.१८००-२०२० या कालावधीतील विविध शैक्षणिक धोरणांचा व त्यांच्या परिणामांचा संशोधनात्मक अध्ययन ही या संशोधन विषयाची व्याप्ती आहे. संशोधनात्मक अध्ययनासाठी तथ्य संकलन करताना शिक्षण तज्ज्ञांच्या, मंत्र्यांच्या, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांच्या केवळ प्रातिनिधीक स्वरुपात काही मुलाखती घेतल्या जातील हीच या संशोधनाची मर्यादा आहे. अर्थात संशोधनात्मक सत्य मांडताना कोठेही सत्याचा अपलाप होणार नाही याची संशोधकाद्वारे पूर्ण दक्षता घेतली जाईल.

९. आजवर झालेल्या संशोधनाचा आढावा: (संशोधन विषयाचे वेगळेपण):

भारतात आजपर्यंत अनेक संशोधक व लेखकांनी मोठ्या प्रमाणात संशोधन व लिखाण केले आहे. शिक्षा व समाज व्यवस्था ग्रंथाबद्दल रसेल यांनी शिक्षण आणि समाज व्यवस्था या अनुषंगाने लेखन करुन समाजावर शिक्षणाचा कसा प्रभाव पडला हे स्पष्ट केले. डॉ. शंकर दयाल शर्मा यांनी शिक्षा के आयाम या ग्रंथात शिक्षणाचा उद्देश याविषयी मांडणी केली आहे. तसेच महाराष्ट्रातील महाविद्यालयीन प्रश्न या ग्रंथात विद्यार्थी साहित्य समितीने महाविद्यालयीन जे प्रश्न उद्भ्वतात याविषयीची मांडणी केली आहे.

स्वामी विवेकानंद यांनी आदर्श शिक्षण या ग्रंथात शिक्षणाचे महत्व व शिक्षकांच्या चारित्र्याविषयी मांडणी केली. विद्यार्थ्यांनी जागृत होऊन मोठ्या प्रमाणात प्रगती साधली पाहिजे असे नमुद केले. डॉ. सिध्देवाड

यांनी भारतीय शिक्षण सातत्य आणि स्थित्यंतरे या ग्रंथात भारतीय समाजातील शिक्षण विषयक सातत्याची मांडणी केली आहे. तसेच डॉ. के.शुक्ला यांनी अन इंफॉर्मेशन हँडबुक या शैक्षणिक धोरणाचा आढावा घेतला आहे. एन.बी.सेन यांनी प्रोग्रेस ऑफ एज्युकेशन इन फ्री इंडिया या ग्रंथात स्वातंत्र्य भारतातील शिक्षण धोरणाची मांडणी केली. के.बी.पवार यांनी इंडियन हायर एज्युकेशन या ग्रंथात भारतीय उच्च शिक्षणाविषयी मांडणी केली. तथापि एकूण स्वातंत्र्यपूर्वकालीन व स्वातंत्र्योत्तर--कालीन समग्र शैक्षणिक धोरणांचा संकलित स्वरुपात फारशे संशोधन झालेले आढळुन येत नाही. प्रस्तुत शोध प्रबंधात 'भारतातील शैक्षणिक धोरणांचा ऐतिहासिक अभ्यास १८०० ते २०२०' यात अजुन सखोल माहिती देण्याचा प्रयत्न होईल व हेच या संशोधनाचे वेगळेपण आहे.

१०. संशोधन विषयाचे महत्व:

भारतातील शैक्षणिक धोरणाचा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास करीत असताना अनेक प्रभावी बदल करण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि त्यामुळे भारतीय समाजात प्रचंड गतीने बौध्दिक सामाजिक सांस्कृतिक राजनैतिक शैक्षणिक देदीप्यमान बदल झाले. ज्ञान विज्ञान तंत्रज्ञान संशोधन या दृष्टीने खूप मोठे परिवर्तन झाले आहे.

शाळा महाविद्यालय विद्यापीठ अशी विविधी स्तरावर ज्ञानाच्या शाखेत विस्तार होत गेला क्रीडा संगीत व्यापार व्यवसाय उद्योग तंत्रज्ञान मनोरंजन कला साहित्य तत्वज्ञान इत्यादी अशा अनेक बाबतीत वाखाणण्याजोगे बदल झाले आहेत तरीही बदलत्या परिस्थितीनुसार शैक्षणिक दृष्टीने उणिवांची ही जाणीव आज आपणास झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळेच या संशोधनाच्या माध्यमातून महत्व अधोरेखीत करण्याचा प्रयत्न करीत आहे. शैक्षणिक धोरणातील उणिवा दुर करुन या धोरणांची उपयुक्तता सर्व स्तरांपर्यत पोहचविण्याचा सदर शोधप्रबंधात प्रयत्न केला जाईल. भारतातील शैक्षणिक उगमा पासून ते आधुनिक भारतातील जी परिवर्तनवादी धोरण तयार झाली त्या सर्व धोरणातील उणिवा व आधुनिक काळातील निर्माण झालेली शैक्षणिक समस्या आणि त्यातील उणिवा व उपाय सुचविण्यास हे संशोधन उपयुक्त ठरेल असा विश्वास आहे.

११. संदर्भसूची

१.	शिक्षा और समाज व्यवस्था	-	ब्रर्दूड रसेल
२.	शिक्षा के आयाम	-	डॉ.शंकर दयाल शर्मा
३.	महाराष्ट्रातील महाविद्यालयीन प्रश्न	-	विद्यार्थी सहाय्यक समिती
४.	आदर्श शिक्षण	-	स्वामी विवेकानंद
५.	भारतीय शिक्षण सातत्य आणि स्थित्यंतरे	-	डॉ.अशोक सिध्देवाड
६.	An Informative Handbook	-	Dr.D.K.Srivastav
७.	Administration of Education in India	-	P.D.Shukla
८.	Progress of Education in Free India	-	N.B.Sen
९.	The Peoples Web on The Challenge Of Education-	-	Dr.Adam Usman Shaikh
१०.	Indian Higher Education-	-	K.B.Pawar

संशोधक
मारोती लक्ष्मणराव सोनकांबळे
एम.ए.(इतिहास), एम.फिल.,सेट.

मार्गदर्शक
डॉ . विजय पांडुरंग कुलकर्णी
एम.ए.पीएच.डी.
प्राचार्य व इतिहास विभागप्रमुख
वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय,
देगलूर ता.देगलूर जि.नांदेड